# शाश्वत संस्था, मंचर

## ता. आंबेगाव जि. पुणे

# वार्षिक अहवाल

## सन – २०१९–२०

SHASHWAT

# सन २०१९—२० या आर्थिक वर्षात संस्थेने राबविलेले उपक्रम

| अ. क्र | कार्यक्रम |
|---|---|
| १ | गाळपेर शेती |
| २ | आरोग्य |
| ३ | निवासी शाळा |
| ४ | बालवाडी |
| ५ | देवराई संवर्धन |
| ६ | नैसर्गिक पाट योजना |
| ७ | लिफ्ट योजना |
| ८ | तळे खोदकाम व बांधकाम |
| ९ | नर्सरी |
| १० | वृक्षलागवड |
| ११ | हिरडा प्रकल्प |
| १२ | दिवाळी फराळ वाटप |
| १३ | सायकल वाटप |
| १४ | उच्च शिक्षणांस मदत |
| १५ | शिलाई मशिन वाटप |
| १६ | भात लावणी यंत्र वाटप |
| १७ | आंबेगाव हॉल फरशी बसविणे व टाकीचे बांधकाम |

SHASWAT

## संस्था पार्श्वभूमी:—

शाश्वत संस्थेची स्थापना १९९६ साली झाली आहे परंतू संस्थेच्या कामाची सुरूवात कुसूम कर्णिक यांनी १९८१ पासून आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणामुळे विस्थापित झालेल्या व आदिवासी बांधवांबरोबर काम करायला सुरूवात केली. लोकांच्या गरजांवर कामाचे स्वरूप होते जसे जमिनीला बांध घालणे म्हणजे पडकई, जमिनीची नोंद करणे, खाते फोड करणे, पाण्यासाठी विहीर, तळी खोदणे, हापसा बसविणे, कुपोषण कमी करण्यासाठी बालवाडया, शाळा व आरोग्य कार्यक्रम, महिलांमध्ये जागृती येण्यासाठी, मेळावे, सेमिनार, दुग्धव्यवसाय. आपले अन्न आपण मिळविणे साठी गाळपेर, इ. मासेमारी, कातकरी प्रश्न, कातकरी घरकुल, निरधुर चुल्हा, कुकुटपालन, वृक्षारोपण, नर्सरी, जंगल प्रश्न, अभयारण्य हे सर्व उपक्रम आंबेगाव जुन्नर व खेड तालुक्यात राबविण्यात आले आहेत.

## सन २०१९—२० या आर्थिक वर्षात संस्थेने राबविलेले उपक्रम

### १) गाळपेर शेती:—


डिंभे धरणामुळे विस्थापित झालेले आदिवासी शेतकरी धरणाचे पाणी कमी झाल्यावर गाळपेर शेती करतात. यामध्ये १९ गावांमधील एकुण ७०० ते ८०० हेक्टर क्षेत्र ६—७ महिने करिता रिकामे होते. डिंभे जलाशयात सन २००६ संस्था राबवत असलेल्या उपक्रमाअंतर्गत गाळपेर शेती प्रकल्प राबवत आहे. डिंभे जलाशयाने सुमारे २२०० हेक्टर क्षेत्र व्यापलेले आहे. ३५० हेक्टर क्षेत्रावर बाजरी, गहू, मेथी, हरभरा व अन्य पिके घेतली जात आहेत. २६५ शेतकरी कुंटुंब आज गाळपेर शेती करुन स्वत:च्या शेतात काम करुन पुरेसे उत्पन्न घेत आहेत. रोजगाराकरिता होणारे स्थलांतर थांबावे व १२ महिने पुरेल एवढे उत्पादन निर्माण करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येईल या उद्देशाने गाळपेर शेती प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.


सन २०१९—२० मध्ये गाळपेर शेतीसाठी मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या मार्फत गाळपेर शेती प्रकल्प राबविण्यात आला. शेतीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम करण्यात आला. गाळपेर शेती केल्यामुळे जंगलतोड कमी झाली आहे. रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबले आहे. गाळपेर शेतीमुळे आर्थिक उत्पन्न व दोन वेळेच्या अन्नाचा प्रश्न सुटत असल्यामुळे अनेक आदिवासी शेतकऱ्यांकडून गाळपेर शेतीसाठी मागणी होत आहे.


SHASHWAT

# उत्पादन सन २०१९–२०

| CROP NAME | 2018-19 TOTAL OUTPUT IN KG | 2019-20 TOTAL OUTPUT IN KG | 2018-19 TOTAL AMOUNT GAINED IN RS | 2019-20 TOTAL AMOUNT GAINED IN RS |
|---|---|---|---|---|
| WHEAT | 40300 | 46400 | 926900 | 1160000 |
| HARBARA | 9540 | 11300 | 410220 | 508500 |
| BAJRI | 34150 | 28100 | 683000 | 702500 |
| DHANA | 19586 | 6217 | 195860 | 62170 |
| METHI | 13095 | 2514 | 130950 | 25140 |
| | | | 2346930 | 2458310 |




गाळपेर लाभार्थी
192
192
996
40
618
डिझेल पंप वाटप
पाईप वाटप
शेतकरी ट्रेनिंग
एक्सपोजर व्हिजिट
बियाणे वाटप




किसान
KISAN






## २) आरोग्य:—

३० वर्षापुर्वी आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण खूप होते. लहान मुलांचे मृत्युचे प्रमाण जास्त होते. खाण्यासाठी लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध नव्हते. या सर्व गोष्टींचा अभ्यास करून आरोग्य प्रश्नांवर काम केले जात आहे. आरोग्य प्रकल्पाचे काम ३० गांवामध्ये केले जात आहे. महिलांमध्ये जागृती करणे, आरोग्याची काळजी घेणे, तथापी संस्थेमार्फत महिलांना ट्रेनिंग देण्याचे काम करण्यात आले, प्रशिक्षण, मेळावे, महिलांना वेळेवर हॉस्पिटलमध्ये आणणे, त्यांच्यावर औषधोपचार करणे वेगवेगळे कॅम्प घेऊन महिलांचे विविध ऑपरेशन करून घेण्यात आली आहेत.


आरोग्य प्रकल्पासाठी बर्नास वेन्नर नॉर्वे व मर्सिडिज बेन्झ यांचे आर्थिक सहकार्य लाभत आहे. आरोग्य उपक्रमांमधून सन १९९९ ते २०१८ पर्यत एकुण २५३९ लाभार्थ्यांना लाभ झाला आहे.

**संस्थेमार्फत पुर्वी राबविण्यात आलेले उपक्रम**




# सन २०१९–२० मध्ये आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत राबविलेले उपक्रम

कार्यक्रमास उपस्थित असलेले लाभार्थी




सन २०१९–२० वर्षात आरोग्य कार्यक्रमाला १३९२ लाभार्थी उपस्थित होते.

ऑपरेशन केलेले पेंशट




सन २०१९–२० वर्षात आरोग्य कार्यक्रमातून ११२ पेंशटचे ऑपरेशन करण्यात आले आहे.









## ३) निवासी शाळा:—

संस्थेमार्फत आदिवासी भागात सन २०००—२००१ सालापासून आघाणे या आदिवासी गावात वनदेव विद्या मंदिर आघाणे ही निवासी, विनाअनुदानित शाळा सुरू केली आहे. शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ६वी पर्यत कातकरी, महादेव कोळी, ठाकर, बौध्द, फासेपारधी या समाजाची एकुण ५४ इ. मुले शिक्षण घेत आहे. शाळेमध्ये मुलींचे प्रमाण नेहमी जास्त असते. सर्व मुलांना मोफत शिक्षण, आहार, आरोग्य सोयी दिल्या जातात. शाळेत शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. ज्ञानप्रबोधिनी पुणे, डोअरस्टेप स्कूल, क्वेस्ट संस्था, सोनाळे नवनिर्मिती पुणे यांच्यामार्फत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आली आहेत.
सन २०१८—१९ पर्यत एकुण ३१० विद्यार्थी शिक्षण घेऊन गेले आहेत. शाळेतील भौतिक सुविधांमध्ये सोलर वॉटर हिटर, बागकामांची अवजारे बोलक्या भिंती, तारेचे कुंपण C.C. TV कॅमेरे शौचालये, विविध खेळांची साधने उपलब्ध आहेत.
शाळेसाठी बर्नास वेन्नर, टेक महिंद्रा, थरमॅक्स यांचे शाळेसाठी आर्थिक सहकार्य लाभले आहे. मर्सिडिज बेन्झ यांचे आर्थिक सहकार्य सध्या चालु आहे.

### शाळेमार्फत घेण्यात आलेले विविध उपक्रम:—

| अ.क्र | स्पर्धेचे नाव | एकुण शाळा | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | विज्ञान प्रदर्शन | 7 | 122 |
| २ | क्रिडा स्पर्धा | 13 | 367 |
| ३ | चित्रकला स्पर्धा | 14 | 217 |

SHASWAT






जीवन किती काळ जगलात यापेक्षा जीवन कसे जगलात याला महत्व आहे
MANGO
PAPAYA
BANANA
ORANGE
CARROT
TOMATO



## ४) बालवाडी:—

आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्यामुळे संस्थेने पहिला उपक्रम म्हणून बालवाडी उपक्रम चालु केला होता. सुरूवातीच्या काळात ३२ बालवाडया चालविल्या जात होत्या या सर्व बालवाडयाचे सरकारी अंगणवाडीत रूपांतर करण्यात आले आहे. सन २०१९—२० मध्ये संस्था ७ बालवाडया चालवित आहे. बालवाडयामध्ये महादेव कोळी, ठाकर, कातकरी या समाजाची एकुण ८६ मुले शिक्षण घेत आहेत. बालवाडी शिक्षकांना वेगवेगळे ट्रेनिंग, एक्सपोजर व्हिजीट चे आयोजन संस्थेने केले होते. मुलांना पोषक आहार, गणवेश, खेळणी इ मदत संस्था करत आहे. बर्नास वेन्नर व मोरडे फुडस मंचर यांच्या आर्थिक सहकार्याने बालवाडी प्रकल्प चालु आहे.





### शाश्वत संस्थेतील मुलांना विविध वस्तूंचे वाटप

मंचर, ता. २७ : आंबेगाव तालुक्यांतील आदिवासी भागातील शाश्वत संस्थेच्या सात बालवाड्यांतील आदिवासी व कातकरी कुटुंबांतील ९० मुला-मुलींना साबण, तेल, पाटी पेन्सिल, टूथपेस्ट, ब्रश आदी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

बोरघर येथील आनंद कपूर प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात कार्यक्रम झाला. चाकण येथील मर्सिडीज बेंझ कंपनी तर्फे दिवाळीनिमित्त भेटवस्तू देण्यात आल्या. भेटवस्तू मिळाल्याने व खाऊवाटप झाल्यामुळे मुलांचा आनंद द्विगुणित झाला. वस्तूंचे वाटप शाश्वत संस्थेचे उपाध्यक्ष, विश्वस्त सुरेश राजवाडे, कोशाध्यक्ष अशोक आढाव यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळा व्यवस्थापिका प्रतिभा तांबे म्हणाल्या, "ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या कुसुम कर्णिक यांनी १९९९ पासून आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी दुर्गम भागात बालवाड्या सुरू केल्या. कुपोषण कमी करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. एक ते पाच वयोगटातील बालकांना बालवाडीत मोडाचे कडधान्य मूग, मटकी हरभरा, तांदूळ खिचडी, गोड रवा, लापशी आदी सकस आहार दिला. त्याचबरोबर गाणी, गोष्टी, शिकणे व स्वच्छतेच्या सवय लावली. बालवाडी शिक्षिकांना वेळोवेळी प्रशिक्षणही दिले. दर्जेदार शिक्षण मिळाल्याने कातकरी व आदिवासी समाजातील मुले व मुली शिक्षणाच्या प्रवाहात आली."

बालवाडी शिक्षिका नुरजहाँ पठाण, अलका लेंभे, चंद्रभागा बांबळे, मंगल लांघी, भारती लोखंडे, इंदुबाई असवले व शांतिराम गुंजाळ, सुदाम चपटे, देवराम असवले, संजीव असवले व पालक उपस्थित होते.

बोरघर (ता. आंबेगाव) : आनंद कपूर प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात दिवाळीनिमित्त बालवाडीतील मुलांना भेटवस्तू देताना मान्यवर.

## ५) देवराई संवर्धन:—

आदिवासी भागांमध्ये देवासाठी राखून ठेवलेले जंगल म्हणजे देवराई होय. देवरायांमधील झाडांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी देवराई उपक्रम संस्थेने मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या अर्थसहाय्याने हाती घेतला आहे. अनेक देवराया विरळ होताना दिसत आहेत. देवरायांमध्ये अधिकाधिक झाडे लावणे, जाळपटटा काढणे अशा प्रकारचे उपक्रम राबविले आहे त्यांचे संवर्धन व संरक्षण करणे, देवरायांना कुंपण करणे, झाडांच्या शेजारी कट्टे तयार करणे. जंगल वाचविण्यासाठी देवरांयामध्ये देवराई बचावांच्या पाटया लावणे, देवराईचे महत्व पटवून देणे इ. काम करण्यात येत आहे. आदिवासी शेतकरी देवरायांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या संदर्भात यात्रा भरविण्याचे काम करत आहेत. पिंपरी येथील देवराईत रस्त्यांच्या कडेने १ हजार रोंपाची लागवड केली होती तसेच देवराईत नियमांचे पालन करण्याविषयीचे बॅनर लावण्यात आले होते. कुंपण करण्यात आले होते यामुळे देवराई संवर्धनास मदत झाली आहे.







## ६) नैसर्गिक पाट योजना :—

आंबेगाव तालुक्यात आदिवासी दुर्गम भागात डोंगर उतारावर पुर्वी कोणत्याही प्रकारचे साधन उपलब्ध नसल्याने शेती करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होत होत्या. शेतकऱ्यांनी गावांच्या शेतीच्या बाजूने वाहणाऱ्या झऱ्याला वळण देऊन पाटा द्वारे पाणी गावाच्या शेतीच्या ठिकाणी वळविण्यात आले होते. पाण्यावरती रब्बीची तुरळक प्रमाणात पिके घेतली जात होती. ४० ते ४५ वर्षा पुर्वीचा पाट असल्याने त्याची नादुरूस्ती झाली होती. संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळया अभ्यासावरून सर्व पाटांचे पुर्नजिवीत करण्यासाठी विकास आराखडा तयार केला. बेंढारवाडी कुशिरे बु. पाटण या गावांची निवड करण्यात आली पाटाचे मोजमाप करून पाट खोदुन ८ इंची PVC ६ आणि ४ इंच अशा वेगवेगळया साईजचे पाईपद्वारे हाप राउंड सिमेंट पाईप टाकून पाणी शेतीसाठी उपलब्ध झाले. पाटाच्या वरच्या बाजूला ओढयाला ३ ते ४ फुट उंचीचे सिमेंट कॉंक्रिटचे वळण बंधारे बांधून पाणी पाईपलाईनमध्ये सोडले आहे यामुळे पाण्याचा प्रवाह वाढला आहे. गावातील शेतकऱ्यांना भात लागवड पिकासाठी तसेच गहु, हरभरा, पिकासाठी फायदा झाला आहे. पाण्यासाठी कुठलीही उर्जा वापरली जात नसून २४ तास पाटाला पाणी रहात आहे. मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या अर्थसहाय्याने नैसर्गिक पाट बनविण्यात आले आहेत.

| अ.क्र | गावांची नावे | पाटाचे अंतर (फुट) | लाभार्थी संख्या | क्षेत्र (एकर) | घेतलेली पिके |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेंढारवाडी | ५५६० | ५३ | ५८ | भात, गहु, हरभरा, वटाणा, मसुर, मका |
| २ | कुशिरे बु. | २६४० | ३४ | २८ | |
| ३ | पाटण | ४५५४ | ४६ | ३७ | |









**कसरा**

**शांश्वत संस्थेकडून बेंढारवाडी गावाचा उन्हाळ्यातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटला..**

**भीमाशंकर, (वार्ताहर) :** आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील पोखरी बेंढारवाडी गावाची उन्हाळ्यात पाण्यासाठी धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती होती. ही त्यांची गरज ओळखून शाश्वत संस्थेने त्यांना उन्हाळ्यातही पाणी उपलब्ध होईल यासाठी ग्रामस्थांच्या मदतीने पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यात आली. पाईपलाइनमुळे २०० लोकवस्तीला उन्हाळ्यातही आता पाणी उपलब्ध होणार आहे.

तालुक्यातील आदिवासी भागातील गावे, वाड्या, वस्त्या अवघड ठिकाणी डोंगरांच्या कुशीत वसलेली आहेत. पोखरी गावची बेंढारवाडी तीव्र उतारावर नदीकिनारी वसलेली आहे. दरवर्षी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. गावाला पाणी मिळावे यासाठी ग्रामस्थांनी शाश्वत संस्थेकडे पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याची विनंती केली होती.

त्यावेळी संस्थेमार्फत सर्व्हे करण्यात आला. अन् प्रत्यक्ष लोकांची गरज व निकड समजून घेऊन पाईप लाईनचे काम पूर्ण करण्यात आले. पाईपलाईन करताना ग्रामस्थांचे संपूर्ण सहकार्य मिळाले. ग्रामस्थांना कुठलाही खर्च झाला नाही. २०० लोकवस्तीच्या या वाडीत पहिल्याच पावसात पाईपलाईनचे पाणी शेतापर्यंत पोहोचल्या लोक आनंदित झाले आहे[त] सुमारे चार हजार फुट लांबी[च्या] पाईपलाईन करून पाच ठिका[णी] पाण्याची बारी काढल[ी.] ग्रामस्थांनी हे काम एक महिन्या[त] पूर्ण केले आहे. पावसाळ्यानंतर[ही] पाणी उपलब्ध होणार असल्या[ने] दुबार पिके घेणे शक्य होणा[र] आहे.

दरम्यान या कामासाठ[ी] मर्सडिज बेंझ चाकण यां[चे] अर्थसाह्य मिळाले. शाश्वत[चे] उपाध्यक्ष सुरेश राजवाडे कोषाध्यक्ष अशोक आढाव सतीश भिंगारे यांनी सहकार्य केले. शांताराम गुंजाळ, सुदा[म] चपटे, कृष्णा वडेकर, स्थानिक ग्रामस्थ अशोक कोळप यांन[ी]

**७) लिप्ट योजना:—** डिंभे धरण पाणलोट क्षेत्रात महाळुंगे या ठिकाणी प्रायोगिक तत्वावरती एक शेतकरी ग्रुप तयार करून लिप्ट योजना करण्याचे ठरविण्यात आले. संस्थेच्या माध्यमातून तसेच मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या आर्थिक सहाय्यातून महाळुंगे येथे सौर उर्जेवर चालणारा 7.5 HP चा मोटार पंप सेट बसविण्यात आला आहे तसेच १४०० फुट पाईपलाईन करण्यात आली.

१७ शेतकरी कुटंबाना लिफ्ट योजनेचा फायदा झाला आहे. शेतकऱ्यांना वर्षातून एकुण ३ पिके घेता येतात त्यामुळे शेतकऱ्यांचे मजुरीसाठी होणारे स्थलांतर थांबले आहे.

| अ. क्र | गावाचे नाव | लाभार्थी संख्या | क्षेत्र (एकर) | घेतलेली पिके |
|---|---|---|---|---|
| १ | महाळुंगे | १७ | ९ | भात, गहु, हरभरा, वटाणा, मसुर, मका |
| | | | | |





SHASHWAT





## ८) तळी खोदणे व बांधकाम करणे:—

शाश्वत संस्था, मंचर व मर्सिडिज बेन्झ चाकण व मर्सिडिज बेन्झ रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट इंडिया प्राय. लिमीटेड बेंगलोर यांच्या अर्थसहाय्याने आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात पाणी प्रश्नांवर काम करत आहे. संस्थेमार्फत पूर्वी अनेक तळी खोदली आहेत परंतू अलीकडच्या काळात वाढलेली लोकसंख्या तसेच जनावरांची संख्या यामुळे तळयातील पाणी उन्हाळयात पिण्यासाठी शिल्लक राहत नाही. पाण्यासाठी दुरू जावे लागते व वेळ व श्रम वाया जातात. तसेच तळयातील पाणी उन्हाळयाच्या दिवसांत दुषित होते त्यामुळे आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होतो म्हणून अनेक गावांनी तळयांचे रूंदीकरण व खोलीकरण करण्यासाठी संस्थेकडे मागणी अर्ज केले संस्थेकडे आलेल्या मागणी अर्जाचा विचार करून भूगर्भ शास्त्रज्ञांकडून सर्व्हे करण्यात आला आहे. घोडेवाडी, वरसावणे, उंबरवाडी, कापरवाडी, भांगलेवाडी, जांभळेवाडी, काळवाडी नं.२, या गावांमध्ये तळयांचे खोदकाम पूर्ण झाले असून घोडेवाडी व वरसावणे येथील तळयाचे बांधकाम पूर्ण झाले आहे व इतर तळयांची बांधकाम चालू आहेत.

| अ.क्र | तपशिल | लाभार्थी | जनावरे | पूर्वीचा पाणीसाठा घनमीटर | आताचा पाणी साठा घनमीटर |
|---|---|---|---|---|---|
| १ | उंबरवाडी | 350 | 120 | 398.8 | 1320.2 |
| २ | कापरवाडी | 257 | 176 | 456.4 | 1420.6 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | काळवाडी | 100 | 25 | 152.1 | 861 |
| ४ | जांभळेवाडी | 250 | 100 | नविन तळे | 371.2 |
| ५ | भांगलेवाडी | 155 | 30 | नविन तळे | 553.1 |
| ६ | वरसावणे | 140 | 90 | 360.3 | 1135.9 |
| ७ | घोडेवाडी | 520 | 110 | 280 | 1115.8 |
| | **एकुण** | **1772** | **651** | **1647.6** | **6777.8** |

**भांगलेवाडी**




**काळवाडी न. २**







**मेनुंबरवाडी** **वरसावणे**

## ९) नर्सरी:—

शाश्वत संस्थेने मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या अर्थसहाय्याने शिनोली व दिगद २१००० रोपांची लागवड करण्यात आली आहे. नर्सरीमध्ये हिरडा, बेहडा, बांबु, करंज सिताफळ, आवळा, चिंच, शिवण, रिठा, बाहवा, अकाशिया, आपटा, बोर, सादडा, जांभुळ, इ. प्रकारच्या बियांची लागवड करण्यात आली होती. रोपे वनविभागाच्या करारानुसार आघाणे व जांभळेवाडी व आहुपे येथील वैयक्तिक मालकीवर, लावण्यात आली आहेत. नर्सरी प्रकल्पातून वर्षभर ३३४ आदिवासी लोंकाना रोजगार उपलब्ध झाला आहे. शिनोली व दिगद नर्सरीतील ३४३३२ रोपांची विक्री करण्यात

आली आहे. आंबेगाव या ठिकाणी संस्थेच्या माध्यमातून आर्युवेदिक नर्सरी तयार करण्याचे काम चालु आहे.





## १०) वृक्षलागवड:—

शाश्वत संस्था सन २०१८—१९ पासून मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या अर्थसहाय्याने वृक्षारोपण प्रकल्पावर काम करत आहे. दिवसेदिवस सर्व ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जंगलामध्ये वाढ व्हावी व पर्यावरणाचे संरक्षण व्हावे या उदेशाने संस्थेने वृक्षलागवड प्रकल्प हाती घेतला आहे. संस्थेने सन २०१८—१९ या वर्षामध्ये आदिवासी भागात आहुपे, बालविरवाडी, आघाणे व जांभळेवाडी या ठिकाणी वृक्षलागवड केली आहे. वृक्षारोपणात हिरडा, बेहडा, बांबु, करंज सिताफळ, आवळा, चिंच, शिवण, रिठा, बाहवा, अकाशिया, आपटा, बोर, सादडा, जांभुळ, रोपे लावण्यात आली आहेत. वृक्षारोपणामुळे झाडांच्या संख्येत वाढ होऊन जंगल वाढीस मदत होणार आहे व ऑक्सिजनच्या प्रमाणात वाढ होणार आहे. सन २०१८—१९ या वर्षा अखेरीस एकुण २०९८० रोपांची लागवड लागवड करण्यात आली. रोपांना अळी करणे, गवत काढणे, कुंपण करणे, पाणी देणे इ. संगोपनाची कामे चालु आहेत. वृक्षलागवड प्रकल्प शाश्वत, मर्सिडिज बेन्झ चाकण व वनविभाग यांच्या त्रिस्तरीय कराराने राबविला जात आहेत.

| अ.क्र | ठिकाण | जिवंत रोपे | नैसर्गिक वाढीची रोपे | एकूण जिवंत रोपे | मजूर |
|---|---|---|---|---|---|
| १ | आहुपे | 3222 | 629 | 4171 | 446 |
| २ | बालवीरवाडी | 1731 | 82 | 2313 | |
| ३ | आघाणे | 3020 | 348 | 3538 | |
| ४ | जांभळेवाडी | 2279 | 60 | 2619 | |
| | **एकूण** | **10252** | **1119** | **11371** | **446** |









## ११) हिरडा प्रकल्प:—

आदिवासी भागात हिरडयाची झाडे मोठया प्रमाणात आहेत. बाळ हिरडा व मोठा हिरडा अशा दोन प्रकारचे हिरडे आदिवासी भागात आढळतात. बाळ हिरडयाचा भाव २०० ते २५० रूपये किलो व मोठा हिरडा १० ते १५ रूपये किलोनी बाजारामध्ये विक्री केली जाते. महिलांना हिरडा कसा फोडावा, फोल वेगळे कसे करावे, व हिरडा मशिन कशी हाताळावी याचे ट्रेनिंग व प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मशिन मिळाल्यामुळे महिलांना आनंद झाला महिलांनी स्वता: हिरडा फोल विक्री करावी यासाठी एक्सपोजर व्हिजिटचे आयोजन आयुर्वेद रसशाळा पुणे येथे करण्यात आले होते. हिरडा प्रकल्प याही वर्षी चांगल्या रितीने महिला चालवित आहेत. हिरडा मशिन उपक्रमातून १५०० ते २००० लोंकाना या उपक्रमाचा लाभ होणार आहे. सदर मशिनमध्ये सुधारणा करण्यात आहे त्यानंतरच त्याचे मोठया प्रमाणात विक्री करता येणे शक्य होईल. मागील वर्षी एकुण हिरडा फोल आयुर्वेद रसशाळा यांना पाठवला व त्यातून १५००० रूपयांचे उत्पन्न मिळाले आहे.





## १२) दिवाळी फराळ वाटपः—

शाश्वत संस्था प्रत्येक वर्षी कातकरी कुंटंबाना दिवाळी फराळ वाटप करत असते त्याप्रमाणे सन २०१९—२० या वषीर्त आंबेगाव कातकरी वस्ती, अडिवरे कातकरी वस्ती, शिनोली कातकरी वस्ती, डिंभे कातकरी वस्ती ३०० कुंटुंबाना फराळ वाटप करण्यात आले आहे.







अडिवरे (ता. आंबेगाव) : शाश्वत संस्थेतर्फे कातकरी कुटुंबांना फराळवाटप करण्यात आले. या वेळी कातकरी कुटुंब व शाश्वतचे पदाधिकारी.

## तीनशे कातकरी कुटुंबांना शाश्वत संस्थेकडून फराळ

मंचर, ता. २७ : दिवाळीत घरोघरी उत्साहाचे वातावरण असते. प्रत्येक कुटुंब ऐपतीप्रमाणे दिवाळीचा आनंद साजरा करते. पण, गोरगरिबांना यापासून वंचित राहावे लागते. गोरगरिबांना किमान फराळ मिळावा म्हणून आंबेगाव तालुक्यात मंचर येथील शाश्वत संस्थेने पुढाकार घेतला आहे. आठ गावांतील कातकरी समाजाच्या वस्त्यांवर जाऊन ३०० कुटुंबांना दिवाळीनिमित्त फराळवाटप केले आहे.

शाश्वत संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश राजवाडे, कोशाध्यक्ष अशोक आढाव, विश्वस्त प्रतिभा तांबे व कार्यकर्ते शांताराम गुंजाळ, सुदाम चपटे, देवराम असवले, शंकर लांघी, धर्मा असवले यांनी फराळवाटप केले. फुलवडे, आंबेगाव वीटभट्टी, आंबेगाव घरकुल, वचपे, अडिवरे, आमडे, डिंभे, शिनोली (इंदिरानगर) आदी वस्त्यांवर जाऊन फराळवाटप केले.




**१३) सायकल वाटप कार्यक्रम:—** आदिवासी भागातील गरजु व शिक्षण घेत असलेल्या आदिवासी मुलींना व्हिलेज डेव्हलपमेंट लंडन कौन्सिल यांच्यामार्फत १८ सायकली वाटप करण्यात आल्या व मुलींना पुढील शिक्षणास मदत झाली.





## १४) उच्च शिक्षणांस मदत:—

**शिष्यवृत्ती कार्यक्रम—** आदिवासी भागातील महादेव कोळी, ठाकर, कातकरी या समाजातील १५ मुलामलींना दिलीप दिक्षित व निलीमा आपटे फंड यांच्यामार्फत शिक्षणासाठी शिष्यृत्ती वाटप करण्यात आली.

**१) रेवन मुठे पिंपरी:—** या आदिवासी गावातील रहिवासी असून भटेवरा फाऊंडेशन यांच्याकडून ३० हजार रूपयांची शिष्यवृत्ती व शाश्वत संस्थेमार्फत ६ हजार रूपयांची शिष्यृत्ती देण्यात आली आहे.

**२) कोमल धर्मा आढारी:—** चिखली या आदिवासी गावातील रहिवासी असून नशिक येथे बी. एस. ॲग्री चे शिक्षण घेत आहे. भटेवरा फाऊंडेशन पुणे यांच्याकडून १५००० व शाश्वत संस्थेकडून ६००० रूपयांची शिष्यृवत्ती देण्यात आली आहे.

**३) सुभेच्छा बजरंग वंजारी** ही कातकरी समाजाची मुलगी असून पिंपरी चिंचवड येथे नर्सिंगचे शिक्षण घेत आहे. आर्थिक अडचणीअभावी शिक्षण घेणे शक्य नव्हते. संस्थने भटेवरा फाऊंडेशन पुणे यांच्याकडून २५००० व शाश्वत संस्थेकडून ६००० आर्थिक मदत केली आहे.

**४) प्रमिला अशोक बोऱ्हाडे:—** ही मराठा समाजाची मुलगी आहे. आई वडील मोलमजुरी करून शिक्षण करत आहेत. दिलीप दिक्षीत फंड यांच्याकडून ६००० रूपये शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.

**५) छाया बारकु हिलम:—** ही कातकरी समाजाची मुलगी असून आईवडील मासेमारी करून उदरनिर्वाह करत आहेत. दिलीप दिक्षीत फंड यांच्याकडून ६००० रूपये शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.





**१५) शिलाई मशिन वाटप उपक्रम:—** प्रमिला प्रकाश आवारी या गरजु महिलेला दि. २६/१२/२०१९ रोजी संस्थेमार्फत शिलाई मशिन देण्यात आली. कुटुंबाचा उदरनिर्वाह शिलाई मशिनच्या येणाऱ्या उत्पन्नातून करत आहे.



**१६) भात लावणी यंत्र वाटप:—** आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागात पावसाचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात असते. आदिवासी भागातील प्रमुख पिक हे भात असल्याने येथे भातशेती केली जाते. परंतु आदिवासी शेतकरी भातलागवड हाताच्या सहाय्याने केली जाते. भात लावणी करण्यासाठी २५ ते ३० दिवस लागत असल्यामुळे कमी वेळात शेती व्हावी व श्रम वाचावेत म्हणून शाश्वत संस्थेने यंत्राच्या सहाय्याने भातलागवड करण्याचे ट्रेनिंग ३०० शेतकऱ्यांना दिले तसेच शेतकरी गट तयार १६८ शेतकऱ्यांना ७ भातलागवड मशिन वाटप करण्यात आल्या.

| अ.क्र | गावाचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | आहुपे जळकेवाडी | 18 |
| 2 | आहुपे मधलीवाडी | 15 |
| 3 | पिंपरगणे | 25 |

| | | |
|---|---|---|
| 4 | डोण | 42 |
| 5 | पिंपरी | 25 |
| 6 | बेंढारवाडी | 19 |
| 7 | बालविरवाडी | 24 |
| **एकुण** | | **168** |





**१७) आंबेगाव हॉल फरशी बसविणे व टाकी बांधकाम करणे:—** शाश्वत संस्थेचे आनंद कपूर प्रशिक्षण केंद्र येथे मेळावे, मिटिंग, प्रशिक्षणे व आयोजन केले जाते. हे कार्यक्रम पार पाडण्यासाठी आर. व्ही नाईक ट्रस्ट सातारा यांच्या अर्थसहाय्याने जुना आंबेगाव येथील आनंद कपूर प्रशिक्षण केंद्राच्या वरच्या मजल्यावरील हॉलला २५०० स्क्वेअर फूट टाईल्स बसविण्यात आली. तसेच जमिनीखालील पाण्याची १६ हजार लिटर क्षमतेची टाकी बांधण्यात आली.





## अर्थसहाय्य:–

१) मर्सिडिज बेन्झ, इंडिया कार प्लॅण्ट चाकण, पुणे
२) एम. बी. आर. डी. आय. बेंगलोर,
३) डी. एफ. एस. चेन्नई/पुणे
४) बर्नास वेन्नर, नॉर्वे
५) मोरडे फुडस, मंचर
६) टाटा मोटर्स, पिंपरी, पुणे
७ आर. व्ही नाईक ट्रस्ट, सातारा
८) वैयक्तिक डोनेशन

## सन २०२०–२०२१ या आर्थिक करावायाचे उपक्रम

१) गाळपेर शेती प्रकल्पातून २९३ कुंटुबाचा अन्नधान्याचा वर्षभराचा प्रश्न सोडविणे,
२) वृक्षलागवड प्रकल्पाअंतर्गत ३३ हजार झांडाचे संगोपन करणे व गावातील लोंकाना रोजगार उपलब्ध करून देणे

३) आंबेगाव तालुक्यात २० गावांतील २६ आरोग्य कार्यकर्त्यांच्या मदतीने आरोग्य कॅम्प, महिला सक्षमीकरण, किशोरवयीन मुलींनमध्ये जाणीवजागृती कार्यक्रम, परसबाग इ. कार्यक्रम घेऊन १२०० महिलांपर्यत पोहचणे.
४) खेड तालुक्यात ७ गावांत महिला सक्षमीकरण, आरोग्य कॅम्प महिला प्रौढ शिक्षण कार्यक्रम, राबवून ५०० महिलांपर्यत पोहचणे.
५) खेड तालुक्यात पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे.
६) उच्च शिक्षणांसाठी आदिवासी मुलांमुलींना शिष्यवृत्ती मिळवून देणे व पुढील शिक्षणासाठी उत्तेजन देणे
७) हिरडा उद्योगाला चालना देणे.
८) गावातील महिलांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी विविध व्यवसायिक प्रशिक्षण देणे व विक्री व्यवस्थापन करणे
८) पाण्याच्या तळे व विहिरींचे खोदकाम व बांधकाम करणे (८ ते १० गावांमध्ये) करणे.
९) वन औषधी नर्सरी तयार करणे व लोंकाना उत्पन्न मिळविण्यासाठी प्रोत्साहित करणे.
१०) आंबा लागवड करून कलम करणे, १००० लाभार्थी निवडणे.
११) देवराई संगोपण व संरक्षणासाठी विविध गावातील ग्रामस्थांमध्ये जागृती कार्यक्रम राबविणे
१२) लोकसहभागातून भातलावणी यंत्र वाटप करणे

## बोर्ड ऑफ ट्रस्टीज:—



Vidya Bal
President

A Journalist by profession with 50 years of experience in editorial, journalism and social field. Worked with Kirloskar Publications, for 22 years as an Editor of "Stree" magazine. Started publication of Marathi magazine "Milun Saryajani" in 1989 and working in the capacity of Chief Editor till date. In 1982 started an organization by name “Nari Samata Manch” for upliftment of women and for creating awareness amongst women for their legitimate rights. A versatile personality with recipient of several awards for her valuable contribution in Editorial and social

SHASWAT



An Employee Relations & Human Resources professional with 38 years of experience in corporate sector. He is a Commerce graduate with Masters in Personnel Management and PGD in Ecology. Worked in senior managerial capacity with Kirloskar group for 20 years and with Mercedes-Benz India, Pune for 18 years having good track record in building Interpersonal Relationships and Human Resources Management. He was also responsible for CSR initiatives at Mercedes-Benz India, Pune.

**Suresh Rajwade**
Vice President
& Managing Trustee



She has done her Masters in Psychology. She is a founder member of Shashwat Trust having 47 years of work experience. She started working with tribals in Ambegaon, Junnar and Khed talukas of Pune district in Maharashtra since 1981 with the objective of reducing poverty of displaced tribal communities and to empower the tribal communities to address their concerns related to their entitlements, livelihood, human rights and social justice. A dynamic personality with recipient of 7 awards for her valuable contribution in the social field

**Kusum Karnik**
Founder Member
& Trustee



A technically qualified craftsman from Tata Motors Limited, Pune. Having 22 years of work experience in manufacturing sector at Bajaj Auto Limited, Pune. He has spent his childhood in Maharashtra Arogya Mandal, Narodi. He is one of the founder members of Shashwat Trust. Worked closely with Ms.Kusum Karnik and Late Anand Kapoor for last 20 years. Having strong inclination for working in social field especially for betterment of deprived communities.

**Ashok Adhav**
Treasurer



Satish Bhingare
Trustee

A Civil Engineer by qualification having 48 years of experience in the field of Project Management and Water Resource Development. He was Executive Director at Water Resource Department of Maharashtra State. Post retirement he is working as a Consultant in private sector. Excellent technical background and hands on experience in the area of Water Resource Management.



Pratibha Tambe
Truste

She has done her graduation & Post graduation in Arts with psychology and Education as well as she has completed her Diploma in Child Guidance & School Management. Working with Shashwat Trust since 2003 and responsible for overall Administration of Residential School run by Shashwat Trust at Aghane village, Taluka Ambegaon as well as supports Shashwat's Office Administration since 2006. She is also responsible for Shashwat Trust's Balwadi's Training



Sulochana Gawari
Trustee

She is a qualified Nurse by profession. Working with Shashwat Trust for last 10 years as Health Co-ordinator. She has completed her ANM Nursing Course and worked with various hospitals in Pune namely; Sancheti Hospital, Sant Dnyaneshwar Hospital, YCM Hospital and DY Patil Hospital as Nurse. She also worked at Government Residential School at Sonawale, Junnar as Superintendan

**Address-**Shashwat Trust Opp. Thorat Building, Behind Market Yard, Manchar, Tal. Ambegaon, Dist. Pune 410503 Maharashtra, India **Website:-** https://www.shashwattrustmanchar.org **Email Id:-** – shashwattrustmanchar@gmail.com

**Facebook:-** https://facebook.com/shashwat.manchar/ **Phone No:-.** 2133-224107